दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.३१ मार्च २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २१२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 31 March 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 212 ● Pages 4 ● Rate 4 Rs







# भाजपा महायुती सरकारची शेतकरी कर्जमाफी म्हणजे 'लबाडाघरचे जेवण'

## शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा, शेतमालाला हमीभाव द्याः हर्षवर्धन सपकाळ

### फडणवीस सरकारकडून महाराष्ट्रधर्म व संविधानांच्या मुल्यांची पायमल्ली; गोलवलकरांचे 'बंच ऑफ थॉट' लादण्याचा डाव

### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांच्या नेतृत्वाखालील सुरतगाव ते तुळजापूर 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रेला' दांडगा प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

शेतकरी अस्मानी सुलतानी संकटाने त्रस्त असून शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, आत्महत्या वाढल्या आहेत, त्यातच मोदी सरकारने अमेरिकेसमोर सरेंडर होत व्यापार करार केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे, या करारामुळे भारतातील शेती व शेतकरी उद्ध्वस्थ होणार आहे. भाजपा सरकार शेतकरी विरोधी असून फडणवीस सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी म्हणजे 'लबाडाघरचे जेवण, जेवल्याशिवाय खरे नाही', फडणवीस खोटारडे आहेत, जेव्हा कर्जमाफी मिळेल तेव्हाच खरे, असे म्हणत शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेस पक्षाने धाराशिवच्या तुळजापूर तालुक्यातील सुरतगाव ते तुळजापूर शेतकरी संघर्ष न्याय यात्रेचे आयोजन केले होते. या यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, यात्रेचे समन्वयक प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य अशोकराव पाटील, दादासाहेब मुंडे, अमर खानापुरे, धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील, जिल्हा काँग्रेसचे संघटक राजेंद्र शेरखाने, प्रदेश काँग्रेसचे सचिव पांडुरंग कुंभार, प्रशांत पाटील, अग्नीवेश शिंदे, उमेश राजे निंबाळकर, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष विलास शाळू बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनावणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश पावडे यांच्यासह प्रदेश पदाधिकारी कार्यकर्ते, महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेस नेते,



पदाधिकारी यांच्यासह महिला व शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. सकाळी सुरु झालेल्या या यात्रेचा समारोप तुळजापूर येथील शारदा मंगल कार्यालयात सभेने झाला. ड्झ्ऋ गॅस संकटाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी ड्झ्ऋ गॅस ठेवलेले ट्रॅक्टर लोकांचे लक्ष वेधून घेत होते. दुपारच्या सत्रात तुळजापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून यात्रेची सुरुवात झाली व त्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीची महाआरती करण्यात आली. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपा सरकारचा खरपूस समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, देशात व महाराष्ट्रात भाजपा सरकारचा अनागोंदी कारभार सुरु आहे. शेतकरी, कष्टकरी, महिला, तरुणांचे प्रश्न गंभीर आहेत, महागाई, बेरोजगारी वाढली आहे, ड्झ्ऋ सिलेंडर व पेट्रोल,डिझेल मिळत नाही पण सरकार त्याकडे लक्ष देत नाही. देशात हुकूमशाही लादण्याचा प्रयत्न सुरु असून संविधानाची पायमल्ली करून गोलवळकरांच्या 'बंट ऑफ थॉट'ला अभिप्रेत भारत निर्माण करण्याचे षडयंत्र सुरु आहे तर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रधर्माची पायमल्ली करत आहेत. या महाराष्ट्रधर्म बुडव्यांना आई तुळजाभवानी सुबुद्धी देवो व संविधानाला अभिप्रेत भारत घडू दे, असे साकडे घातल्याचेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

**भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण अशोभनीय व किळसवाणे..**

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी विचाराच्या राज्यात प्रतिगामी विचार फोफावत असल्याने खरात सारख्या भोंदूबाबांची संख्या वाढत आहे. अशोक खरात प्रकरणातून जे काही उघड होत आहे ते किळसवाणे असून महाराष्ट्रासाठी अशोभनीय आहे. या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घेऊन प्रकरणावर पडदा टाकता येणार नाही, तर यामध्ये जे मंत्री, आमदार, खासदार, सरकारी अधिकारी यांचा सहभाग आहे त्या सर्वांवर अंधश्रद्धाविरोधी कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे व या प्रकरणातील मास्टरमाईंड कोण हे समोर आले पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरात प्रकरणाचा छडा लावल्याच्या फुशारक्या मारू नयेत. ८-९ महिन्यांपासून त्यांच्याकडे याची माहिती होती, तर एवढा वेळ ते काय झोपा काढत होते काय? असा प्रश्न विचारून महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री मिळाला पाहिजे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# इंदुमिल स्मारक उभारणीसाठी सरकारचा पुढाकार महत्वाचा

### मुख्यमंत्र्यांची भेट घेत स्मारकाच्या कामाला गती देण्याची करणार मागणी-उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

### वाढीव खर्चातील तफावत कंत्राटदाराला देत सरकारने डॉ.बाबासाहेबांच्या पुतळ्याचा मार्ग मोकळा करावा

### गाझियाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या कामाची उपाध्यक्षांसह शिस्थमंडळाने केली पाहणी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर असून, या दौऱ्यादरम्यान त्यांनी राम सुतार यांच्या गाझियाबाद येथील कारखान्यात सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याच्या कामाची पाहणी केली. मुंबईतील इंदू मिल येथे उभारल्या जाणाऱ्या या पुतळ्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.या पाहणीवेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय सेलचे पदाधिकारी व इतर शिष्टमंडळ उपस्थित होते. २०१८ साली या पुतळ्याच्या उभारणीचे कंत्राट राम सुतार यांच्या कारखान्याला देण्यात आले होते. मात्र, २०२६ पर्यंत या



प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्याने शासनाने किंमतीतील तफावत तातडीने कंत्राटदाराला देण्याची गरज असल्याचे अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले.यासंदर्भात त्यांनी लवकरच मुख्यमंत्री यांची भेट घेऊन प्रकल्पातील आर्थिक तफावत दूर करण्यासोबतच MMRDA कडून कंत्राटदारांना वेळेत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले.दरम्यान, ३५० फूट उंचीच्या या भव्य पुतळ्यापैकी सध्या सुमारे ५० फूट काम पूर्ण झाले आहे. पुतळ्याचे बूट आणि पँटचा काही भाग तयार झाला असून उर्वरित काम गाझियाबाद येथील कारखान्यात सुरू आहे. हा प्रकल्प २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.मात्र स्मारकाच्या कामाला २०२८ उजाडणार असल्याचे चित्र आहे.या स्मारकाबाबत बोलताना अण्णा बनसोडे यांनी सांगितले की, इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक हे भविष्यात एक मोठे पर्यटन आणि प्रेरणास्थळ ठरणार आहे. देश-विदेशातील लाखो अनुयायांसाठी हे केंद्र आकर्षणाचे ठिकाण ठरेल, तसेच बाबासाहेबांच्या विचारांचे जतन करणारे एक महत्त्वपूर्ण स्थळ म्हणूनही ते ओळखले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी व्यंकटेश महाजन तर सचिवपदी श्रीधर खोत यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

समस्त ब्राह्मण समाज केज तालुका परशुराम जन्मोत्सव समितीची बैठक शिवराज मुथळे यांच्या निवासस्थानी घेण्यात आली.यावेळी सर्वानुमते व्यंकटेश महाजन यांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.दि.१८ एप्रिल व १९ एप्रिल रोजी भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. भगवान परशुराम जन्मोत्सव साजरा करण्यासाठी यावेळी परशुराम जन्मोत्सवाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली व्यंकटेश महाजन यांची अध्यक्ष, प्रल्हाद देव केजकर उपाध्यक्ष,श्रीधर नाना खोत सचिव,श्रीराम शेटे कोषाध्यक्ष,चंद्रकांत पाटील प्रसिद्धी प्रमुख तर सदस्यपदी श्रीनिवास केजकर,धनंजय कुलकर्णी,प्रदीप कुलकर्णी,चंद्रकांत कुलकर्णी विडा,समीर देशपांडे,अनंत देवा कोकीळ,आनंद कुलकर्णी शिरूर घाट, ऋषिकेश पाटील मांगवडगाव,संदीप जोशी रामवडगाव,शिवाजी कुलकर्णी दीपेवडगाव, गणेश कुलकर्णी तांबवेकर,किरण तांबवेकर,महेश कुलकर्णी येवतेकर, व्यंकट पांडव सारणी सांगवी व समस्त ब्राह्मण समाज केज तालुका अशी कार्यकारिणी निवड करण्यात आली आहे.



भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त दि. १८एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रक्तदान शिबीर व रांगोळी स्पर्धा होतील तर दि.१९ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता मोटार सायकल रॅली हनुमान मंदिर वकील वाडी पासून निघेल कानडी रोड,छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेन रोड मार्गे जय भवानी चौक,मंगळवार पेठ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,गुंड गल्ली,शुक्रवार पेठ बालाजी मंदिर येथे संपन्न होईल.बालाजी मंदिर येथे ह.भ.प. लक्ष्मण इनामदार गुरुजी यांचे व्याख्यान तसेच भगवान परशुराम प्रतिमा पूजन,आरती व प्रसाद व नंतर कार्यक्रम संपन्न होणार आहे.असे समस्त ब्राह्मण समाज केज तालुका यांच्या वतीने बैठकीत ठरले आहे.तरी पंचक्रोशीतील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समस्त ब्राह्मण समाज तालुका केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एलसीबीची 'फिल्डिंग' यशस्वी; शहाद्यात ५५० लिटर स्पिरीट पकडले,एकाला बेड्या

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शिरपूरकडून धडगावकडे अवैधपणे स्पिरीटची वाहतूक करणाऱ्या बोलेरो वाहनावर स्थानिक गुन्हे शाखेने शहादा शहरात सापळा रचून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ८ लाख ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला ताब्यात घेतले आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, शिरपूर (जि. धुळे) येथून कहाटूळ मार्गे धडगावकडे एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो वाहनातून दारू तयार करण्यासाठी लागणाऱ्या स्पिरीटची अवैध वाहतूक होणार होती. या माहितीची खातरजमा करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी तात्काळ पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहादा शहरातील मामाचे मोहिदा चौफुली परिसरात पाळत ठेवून सापळा रचला. संशयित पांढऱ्या रंगाचे बोलेरो वाहन (क्र. एम एच ०४ ई एस ९६५१) येताच पथकाने त्याला अडवून तपासणी केली. यावेळी वाहनात मोठ्या प्रमाणात स्पिरीटचा साठा आढळून आला.पोलिसांनी वाहनातून ५५० लिटर स्पिरीट आणि बोलेरो वाहन असा एकूण ८,६५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी वसंत कुसाल पावरा (वय २६, राहणार बिलगाव, ता. धडगाव) याला जागीच ताब्यात घेण्यात आले. त्याच्यासोबत असलेला दुसरा इसम अंधाराचा फायदा घेत पळून गेला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस, अप्पर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, उपनिरीक्षक मुकेश पवार, विकास गुंजाळ, पुरुषोत्तम सोनार, मोहन ढमढेरे, जितेंद्र पाडवी, विकास कापुरे, शोएब शेख, भरत उगले व सतीष घुले यांच्या पथकाने केली. आरोपींविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# धुळे-सुरत महामार्गावर भीषण अपघात २५ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

### चिंचपाडा परिसरात अज्ञात वाहनाची जोरदार धडक; फरार वाहनाचा पोलिसांकडून शोध सुरू

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

धुळे-सुरत महामार्गावरील चिंचपाडा परिसरात सोमवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास एक भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात विशाल किशन मावची (वय २५, राहणार बेडकीपाडा, नवापूर) या तरुण दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे. एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.मिळालेल्या माहितीनुसार, विशाल मावची हे आपल्या दुचाकीने महामार्गावरून जात असताना समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांना भीषण धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, विशाल यांचा जागीच अंत झाला. घटनेची माहिती मिळताच



विसरवाडी पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी विसरवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे.

या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अपघात करून फरार झालेल्या वाहनाचा आणि चालकाचा शोध पोलीस घेत आहेत. महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे परिसरातून संताप व्यक्त होत आहे.

# संपादकीय

## सवलतीचा अर्धविराम




लांबलेल्या युद्धाने जगभरातील तेल बाजारात हाहाकार माजलेला असताना केंद्र सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कात केलेली दहा रुपयांची कपात, हा तात्पुरता दिलासा म्हणावा लागेल. या निर्णयाद्वारे पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रतिलिटर १३ रुपयांवरून तीन रुपये होणार असून डिझेलवरील उत्पादन शुल्क रद्द होणार आहे. या सवलतीमुळे ग्राहकांसाठी इंधनाच्या किमती कमी होण्याची सुतराम शक्यता नाही; मात्र आंतरराष्ट्रीय तेल बाजार भडकल्याने तेल कंपन्यांना सोसावा लागणारा तोटा काही प्रमाणात कमी होऊ शकतो आणि ग्राहकांसाठी संभाव्य दरवाढ टळू शकते किंवा काही काळापुरती लांबणीवर जाऊ शकते, एवढे नक्की.विरोधी पक्षांच्या आरोपांनुसार, येत्या महिन्यात होऊ घातलेल्या पाच विधानसभांच्या निवडणुकांमध्ये या संभाव्य इंधन दरवाढीचा राजकीय फटका बसू नये, असा आनुषंगिक मुद्दा सत्ताधाऱ्यांनी विचारात घेतला असेलच.सर्वोच्च नेत्याला ठार केल्यानंतर इराण चुटकीसरशी शरण येईल; पर्यायाने फार तर आठवड्याभरात युद्ध संपेल, हा अमेरिका-इस्रायलचा दावा फोल ठरला. उलटपक्षी होर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांना अटकाव करण्याच्या इराणच्या खेळीने साऱ्या जगातील तेलपुरवठ्याची गणिते बिघडवून टाकली आहेत. होर्मुझच्या नाकेबंदीचा फटका बसून एकीकडे अमेरिकेचेच मित्रदेश असलेल्या तेल पुरवठादारांची कोंडी झाली आहे, तर दुसरीकडे तेल-गॅसविना अनेक देशांची घुसमट सुरू आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सहकारी दररोज उलटसुलट विधाने करीत असल्याने जगभरातल्या शेअर बाजारांसह तेलाचा बाजारही तेजी-मंदीचे हेलकावे खात आहे. त्यातून सट्टेबाजांचे मात्र उखळ पांढरे होताना दिसत आहे.तेल दरवाढीचा हा धक्का अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला पेलवणारा नसल्यामुळे शेजारील पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळसह खुद्द अमेरिकेसारख्या देशांतही इंधनाच्या दरात २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. त्या तुलनेत भारतामध्ये साठा उपलब्ध असल्याने आणि रशियातून तेल येत असल्याने ग्राहकांना अद्याप टंचाई-दरवाढीचे चटके बसलेले नाहीत; मात्र तेल कंपन्यांना प्रतिलिटर सुमारे २५ रुपये अधिक मोजावे लागत आहेत. त्यांचा तोटा तीन हजार कोटी रुपयांच्या घरात गेला आहे. तोटा सोसणे आवाक्याबाहेर गेल्यास इंधन दरवाढ हाच पर्याय असल्याने सरकारने उत्पादन शुल्कात सवलत देऊन प्रतिलिटर दहा रुपयांचा दिलासा दिला आहे. इंधनाची दरवाढ झाल्यास वाहतुकीचे दर वाढून अत्यावश्यक वस्तूंसह एकंदर महागाईला तोंड द्यावे लागण्याची भीती आहे. या निर्णयाचा सत्ताधाऱ्यांनी गाजावाजा केला असला, तरी सध्या इंधन स्वस्त होण्याची कोणतीही शक्यता नाही; उलटपक्षी युद्ध लांबले, तेलाचे दर आणखी भडकले (आणि निवडणुका पार पडल्या) तर इंधन दरवाढीचीही टांगती तलवार कायम राहणारच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत 'करोना साथीसारखे आव्हान उभे राहू शकते,' अशा शब्दांत संभाव्य परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवण्याचे सूतोवाच केले आहे. त्यातून उलटसुलट तर्क काढून लॉकडाउनसारख्या शक्यताही व्यक्त झाल्या; मात्र सरकारने त्या फेटाळल्या आहेत. स्वयंपाकाच्या गॅसचे व्यवस्थापन मात्र कोलमडल्याचे दिसते. एकीकडे सरकार गॅसची टंचाई नाही, असे सांगत असताना ठिकठिकाणी लागलेल्या रांगा आणि बंद पडलेल्या हॉटेल-खानावळी आणि टपऱ्यांमुळे वास्तव समोर येत आहे. त्यातच निरनिराळ्या अफवांची नवी डोकेदुखी उभी राहिली आहे; त्यातूनच अनेक शहरांत पेट्रोल पंपांवर रांगा लागल्या. युद्ध लांबलेच, तर भरलेले पेट्रोल किती दिवस पुरणार, हा साधा विचारही कोणी करत नाही.उत्पादन शुल्कात सवलत देऊन सरकारने तेल कंपन्या आणि सर्वसामान्यांना सध्यापुरता दिलासा दिला असला, तरी हे संकट इंधन-गॅसटंचाईपुरते मर्यादित नाही. युद्धस्थितीमुळे पेट्रोलियम पदार्थांसह खतांचा पुरवठाही अडकला आहे. गॅसपुरवठ्याअभावी हॉटेल-पर्यटन उद्योगापुढे अडचणी उभ्या राहिल्या आहेत, तर गॅसअभावी अनेक कारखाने बंद पडून कामगार बेरोजगार झाले आहेत. दुसरीकडे भारतातून आखाती देशांत जाणाऱ्या शेतीमाल-फळांसह अनेक वस्तूंची निर्यात रखडल्याने शेतकरी-व्यापारी चिंतेत आहेत. आयात महागल्याने रुपया दररोज नवनवा तळ गाठत आहे. अशा स्थितीत अर्थव्यवस्थेचे चक्र सुरू ठेवण्याचे मोठे आव्हान देशापुढे आहेच; त्याशिवाय या संकटातून धडा घेऊन ऊर्जासुरक्षेसाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरजही या निमित्ताने अधोरेखित झाली आहे.

# बोरदमध्ये अंगणवाडीच्या वाटेवर साचले गटारीचे पाणी; विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर, प्रशासनाकडून उपाययोजनांचे आश्वासन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील शिरोमणी मानल्या जाणाऱ्या बोरद गावातील 'प्लॉट एरिया' परिसरात गेल्या काही महिन्यांपासून सांडपाण्याच्या निचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः शहादा रस्त्यापासून करणखेडा दिशेला जाणाऱ्या मार्गावर असलेल्या अंगणवाडी क्रमांक ७ च्या परिसरात २०० ते ३०० मीटर अंतरापर्यंत गटारीचे पाणी तुडुंब भरून वाहत असल्याने स्थानिक नागरिक आणि चिमुरड्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येमुळे परिसरात संतापाचे वातावरण असून ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.करणखेडा रस्त्यालागत असलेल्या अंगणवाडीमध्ये परिसरातील लहान बालके पूर्व-प्राथमिक शिक्षणासाठी येतात. शासनाकडून या बालकांना सकस आणि दर्जाचा पोषण आहार दिला जातो, मात्र अंगणवाडीत पोहोचण्यापूर्वीच या मुलांना गटारीच्या घाण पाण्यातून वाट काढावी लागते. यामुळे मुलांच्या पायांना



घाण लागते, परिणामी संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती पालकांकडून व्यक्त केली जात आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ही परिस्थिती 'जैसे थे' असल्याने पायपीट करणाऱ्या नागरिकांना आणि पालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

स्थानिक जागरूक नागरिक दयानंद चव्हाण यांनी या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी सांगितले की, या रस्त्यावरून लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना चालणे कठीण झाले आहे. सांडपाण्याच्या समस्येमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून दुर्गंधीने नागरिक त्रस्त आहेत. जर प्रशासनाने या समस्येचे लवकरात लवकर निराकरण केले नाही, तर या भागातील त्रस्त नागरिक ग्रामपंचायतीवर भव्य मोर्चा काढतील.या गंभीर समस्येबाबत ग्रामपंचायत प्रशासनाची बाजू जाणून घेतली असता, त्यांनी ही समस्या सोडवण्यासाठी सकारात्मक पावले उचलल्याचे सांगितले. ग्रामविकास अधिकारी विजय पाटील यांनी माहिती दिली की, सदर रस्ता हा आमदार राजेश पडवी यांच्या निधीतून मंजूर करण्यात आलेला आहे. या कामाची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन 'वर्क ऑर्डर' (कार्यारंभ आदेश) प्राप्त होताच रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले जाईल.गटारीच्या समस्येबाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, सांडपाणी निचऱ्यासाठी 'जन सुविधा योजने'अंतर्गत तीन टप्प्यांत कामाचे प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर सादर करण्यात आले आहेत. या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळताच कामाला सुरुवात होईल. सद्यस्थितीत तातडीची उपाययोजना म्हणून जेसीबीच्या साहाय्याने काही ठिकाणी गटारींचे खड्डे खोदून पाणी काढण्याचे प्रयत्न झाले आहेत. निधी उपलब्ध होताच या भागाचा कायापालट होईल, तरी ग्रामस्थांनी प्रशासनाला सहकार्य करावे.यावेळी सरपंच अनिता भिलाव, उपसरपंच संतोष ढोडरे व ग्रामपंचायत सदस्यांनीही ग्रामस्थांच्या भावनांची दखल घेतली असून, उपलब्ध निधीतून लवकरात लवकर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे.

# चवदारतळे महाड क्रांती शताब्दी वर्षानिमित्त विशेष प्रातिनिधिक काव्यसंग्रहासाठी कविता आमंत्रित

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

चवदारतळे महाड क्रांतीच्या शताब्दी वर्ष (२०२६. - २०२७) निमित्त सार्थक साहित्य प्रकाशन यांच्या वतीने क्रांती सूर्याचं देणं या विशेष ऐतिहासिक काव्यसंग्रहासाठी राज्यभरातील कवींना कविता पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

क्रांती सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर आधारित हा काव्यसंग्रह समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाच्या महान लढ्याला शब्दरूप अभिवादन करण्यासाठी प्रकाशित करण्यात येणार आहे. या उपक्रमातून महाड क्रांतीच्या ऐतिहासिक वारशाचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रभावीपणे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या काव्यसंग्रहासाठी नामवंत तसेच नवोदित कवींना सहभागी होण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कवींनी समता, सामाजिक न्याय, मानवता, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य, मौलिक विचार, सत्याग्रह आणि महाड क्रांती या विषयांवर आधारित आशयसंपन्न व दर्जेदार मानवतावादी कविता पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त होणाऱ्या कवितांपैकी निवडक कवितांचीच निवड करण्यात येणार असून, कविता स्वतःची आणि अप्रकाशित असणे आवश्यक आहे. प्रथम सहभाग नोंदविणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुक कवींनी प्रा. आशा रणखांबे (सार्थक साहित्य प्रकाशन) व साहित्यिक नवनाथ रणखांबे यांच्याशी /९९६७४३५०३२ / ९९६७४८०९३२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ठाणे जिल्हाधिकाऱ्यांचे लोकाभिमुख प्रशासकीय प्रारूपाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने नागरीकरण होणारा आणि औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्याने आता डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. जिल्ह्याचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता, शासकीय सेवा शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचविण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर होते. हे आव्हान स्वीकारून जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'ई-गव्हर्नन्स सुधारणा अभियानांतर्गत राबविलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांमुळे ठाणे जिल्हा आज संपूर्ण राज्यासाठी एक प्रेरणादायी मॉडेल म्हणून उदयास आला आहे. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवार,दि.२८ मार्च रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित विशेष कार्यक्रमात ठाणे जिल्हा प्रशासनाचा विशेष गौरव करण्यात आला.प्रशासकीय पारदर्शकता वाढविण्यासाठी डॉ.पांचाळ यांनी तंत्रज्ञानाचा वापर करीत 'सेवा संवाद' आणि 'डिजी संवाद' सारखे महत्त्वाचे उपक्रम कार्यान्वित केले आहेत. १५ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झालेल्या 'सेवा संवाद' या उपक्रमामुळे जिल्ह्यातील ८७३ 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या कामकाजात मोठी शिस्त आली आहे. प्रत्येक केंद्रावर उपलब्ध असलेल्या QR-Code मुळे नागरिकांना मिळणाऱ्या सेवेचा दर्जा, सरकारी दरपत्रकाची अचूकता आणि केंद्र चालकाचे वर्तन यावर थेट ऑनलाईन अभिप्राय देण्याची सोय उपलब्ध झाली आहे. या रेटिंग प्रणालीमुळे केंद्र चालकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली असून, अतिरिक्त शुल्काच्या तक्रारींवरही प्रभावी नियंत्रण आले आहे. त्याचबरोबर, नागरिकांना तक्रार निवारणासाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी 'डिजी संवाद' या Whatsapp आधारित (९९३०००११८५) उपक्रमाद्वारे २४७ तक्रार नोंदणीची सुविधा दिली गेली आहे. घरबसल्या केवळ एका मेसेजद्वारे तक्रार नोंदवणे आणि तिचे डिजिटल ट्रॅकिंग करणे शक्य झाल्याने प्रशासन खऱ्या अर्थाने गतिमान झाले आहे. केवळ दैनंदिन कामकाजातच नव्हे, तर ऐतिहासिक वारसा जतन करण्यातही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दूरदृष्टी दाखवली आहे. 'ई-संजीवन' प्रणालीच्या माध्यमातून १८९० पासूनची जन्म-मृत्यू नोंदणीची जुनी 'कोतवाल रजिस्टर्स' आता -ख आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित करण्यात आली आहेत. यामुळे शंभर वर्षांपूर्वीच्या नोंदी शोधणे आता काही सेकंदांचे काम झाले आहे. तसेच, 'राजभूमी' पोर्टलच्या



माध्यमातून शासकीय जमिनींचे डिजिटल व्यवस्थापन सुरू करून प्रशासनाने भू-माफियांवर मोठा वचक बसवला आहे. अक्षांश-रेखांश आणि जिओ-रेफरन्सिंगमुळे सरकारी जमिनींचे अचूक क्षेत्र निश्चित झाले असून, 'लँड बँक' सुविधेमुळे विकास प्रकल्पांसाठी जागा निवडणे आता अधिक सुलभ झाले आहे. या पोर्टलवरील 'Street View' आणि विविध ऋखड लेयर्समुळे अतिक्रमणे शोधणे आणि जमिनींचे संरक्षण करणे सोपे झाले असून हे भू-व्यवस्थापनातील एक मोठे पाऊल मानले जात आहे.जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांचेही डिजिटल मॅपिंग डॉ. पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले आहे. जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, शासकीय शाळा आणि आपत्कालीन सेवांची माहिती नकाशावर उपलब्ध केल्यामुळे सामान्य नागरिकांना या सेवा शोधणे सुलभ झाले आहे. मुख्य रस्त्यांचे जाळे आणि ड्रेनेज व्यवस्थेची डिजिटल माहिती उपलब्ध असल्याने भविष्यातील आपत्ती व्यवस्थापन आणि पूरनियोजन अधिक शास्त्रोक्त पद्धतीने करणे शक्य झाले आहे. अतिदुर्गम शहापूर-मुरबाडपासून ते गजबजलेल्या ठाणे-कल्याणपर्यंतच्या प्रत्येक नागरिकाचा वेळ, पैसा आणि श्रम वाचवण्याचे हे कार्य खरोखरच कौतुकास्पद ठरले आहे.'१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत राबवलेल्या या मूलभूत परिवर्तनासाठी आज एका विशेष सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ठाणे जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, पोलीस अधीक्षक डॉ. डी. स्वामी आणि नवी मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांचा गौरव करण्यात आला. हा सन्मान ठाणे जिल्हा प्रशासनातील प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी आणि समस्त ठाणेकरांसाठी अभिमानास्पद असून, डॉ.पांचाळ व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांनी कार्यान्वित झालेल्या या डिजिटल अध्यायाने प्रशासकीय उत्तरदायित्वाचा एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे.

# रायगड ही शिवरायांची भूमी-डॉ.रागिणी नायक

## काँग्रेस कार्यकर्त्यांनी रायगड जिल्ह्याची शान राखली-महेंद्रशेठ घरत

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

काँग्रेस हा जनता जनार्दनाचा पक्ष आहे. सद्यःस्थितीत राहुल गांधी सर्वसामान्य जनतेसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करतायत. प्रियांका गांधी मोदींना जशास तसे उत्तर देत आहेत. मोदीजी फक्त मन की बात करतात, जनतेला मात्र वाऱ्यावर सोडतात. ही आजची सत्य परिस्थिती आहे. महागाई गगनाला भिडली आहे. मात्र मोदी सरकारला त्याचे देणेघेणे नाही. त्यामुळे काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांच्या संघटनावर आणि जनतेच्या समस्यांवर काम करत आहे. यापुढे जिल्हाध्यक्षांना अधिकाधिक अधिकार असतील. काँग्रेसचे पदाधिकारी निवडीचे निर्णय वातानुकूलित दालनात बसून दिल्लीतून होणार नाहीत, तर जनतेशी संवाद साधून जिल्हाध्यक्षांना विश्वासात घेऊन होतील. रायगड ही शिवरायांची भूमी आहे. शिवाजी महाराज यांची ख्याती जगभर आहे. त्यामुळे रायगडमध्ये काँग्रेसचेच वर्चस्व राहील, यासाठी आम्ही काम करून कार्यकर्त्यांना बळ देऊ, असे प्रतिपादन काँग्रेसच्या दिल्लीतून आलेल्या राष्ट्रीय प्रवक्त्या आणि निरीक्षक डॉ. रागिणी नायक यांनी अलिबाग येथे केले आहे. त्या पुढे म्हणाल्या, शिवरायांच्या भूमीत आल्याचा



मला आनंद आहे. 'सृजन संघटन अभियान' जो देशभर राबविला त्याची वीट मजबूत करण्यासाठी मी आली आहे. असे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाल्या.यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (या. २९) अलिबाग येथील 'काँग्रेस भवन' येथे पार पडली. यावेळी काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या आणि निरीक्षक डॉ. रागिणी नायक, प्रदीप राव, मनोज गणोरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, रायगडमध्ये आमच्या कार्यकर्त्यांनी खूप चांगले काम केले आहे. वर्षानुवर्षे जिल्हा परिषदेत शेकापचे वर्चस्व असायचे, यंदा त्यांना चक्क शून्य जागा मिळाल्या. मात्र काँग्रेसने तीन जागा लढवून दोन जिंकल्या. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी रायगड जिल्ह्याची शान राखली, हे मी अभिमानाने सांगू इच्छितो.यावेळी रायगड जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्य डॉ. मनीष पाटील, अविनाश ठाकूर यांचा रागिणी नायक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. डॉ. रागिणी नायक आणि जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी कार्यकर्त्यांच्या पक्षाविषयी भावना ऐकून घेतल्या.

यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. श्रद्धा ठाकूर, नाना म्हात्रे, युवा अध्यक्ष निखिल ढवळे, अलिबाग काँग्रेसचे राजाभाऊ ठाकूर, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच अलिबाग, मुरूड पदाधिकारी उपस्थित होते.

# हॉकर्स झोन मधील गाल्यांची विक्री ६० हजार रुपयात, हा भूखंड परत मिळविण्यासाठी धमकी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

पनवेल महानगर पालिकेच्या मालकीच्या कळंबोली, खांदा कॉलनी येथील आरक्षित रोजबाजारच्या भूखंडावर काही राजकीय भूमाफीयाकडून बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन टपऱ्या बसविल्या आहेत. पालिकेच्या भूखंडावर उभ्या करण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्यांची बेकायदेशीर विक्रीही करण्यात येत असून गरीब गरजूंना फसविण्याचा कळंबोली येथील प्रकार समोर आला आहे. तेव्हा या भूखंडावरील राजकीय भुमाफियाचे अतिक्रमण हटवून पालिकेमार्फत त्याचे वितरण करण्यात यावे अशी मागणी येथील व्यापारी करत आहेत.

हॉकर्स झोन म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था (महापालिका/नगरपालिका) किंवा प्रशासनाने फेरीवाले, पथविक्रेते आणि लहान व्यावसायिकांसाठी व्यवसायासाठी निश्चित करून दिलेली अधिकृत जागा !. या झोनचा उद्देश अनधिकृत अतिक्रमणे रोखणे, वाहतूक कोंडी कमी करणे आणि फेरीवाल्यांना हक्काची जागा उपलब्ध करून देणे हा असतो, जिथे ते विनासायास व्यवसाय करू शकतात. परंतु कळंबोली सेक्टर ५ए होकर्स झोन प्लॉट न ७ वर व्यवसायासाठी टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत. या भूखंडावरील ६ नंबरची टपरी अरुणा शिवाजी अभंग या चालवत होत्या. पण त्यांनी ती टपरी ५ सप्टेंबर २०२४ आली साधना प्रदीप जसवाल यांना ६० हजार रुपये घेऊन विकली. आता या टपरी वरून वाद सुरू झाला आहे.सिडकोने घरांचे प्रकल्प उभे करताना येथील रहिवाशांना सोय सुविधा देताना प्रत्येक शहरात मोक्याच्या ठिकाणीं हॉकर्स झोनसाठी भूखंड आरक्षित केले आहेत. सिडको वसाहती पनवेल महानगर पालिकेकडे हस्तांतर करण्यात आले आहेत. हे हॉकर्स झोन पालिका सुशोभित करणार आहे. त्यामुळे २०२४ साली विकलेली टपरी आता अरुणा अभंग परत मिळविण्यासाठी साधना जसवाल याना धमकावत आहेत. एकतर हे हॉकर्स झोन मधील दुकाने विकण्याचा अधिकार नसताना ती ६० हजाराना विकून आता तो मिळविण्यासाठी सौ.अभंग दमदाटी करत आहेत. त्यामुळे सौ. साधना जसवाल या पोलिस ठाण्याची मदत घेणार आहेत.

# पीएचडी पदवी प्राप्त-नामदेव दिगंबर सूर्यवंशी यांचा मानाचा तुरा

दैनिक वादळ वार्ता

**हदगांव | प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील कोथळा येथील रहिवासी तसेच पीपल्स महाविद्यालय नांदेड चे माजी विद्यार्थी व सध्या यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील आमणी बुद्रुक येथील टी.जी. देशमुख प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा येथे कार्यरत असलेले पदवीधर शिक्षक प्रा. डॉ. नामदेव दिगंबर सूर्यवंशी यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने राज्यशास्त्र या विषयात यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय राजकारणातील योगदान - एक अभ्यास (विशेष संदर्भ : १९६२ ते १९७७) या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केल्याबद्दल विद्यावाचस्पती/आचार्य/डॉक्टरेट (ऊ्ली ेष झहळश्रीहि्-झह.ऊ) ही सर्वोच्च पदवी देण्यात आली आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख आदरणीय प्रा. डॉ. प्रभाकर गणपतराव जाधव सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पीएचडी मौखिक मुख्य परीक्षेसाठी सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक आदरणीय प्रा. डॉ. लोणारकर सर उपस्थित होते.

या परीक्षेसाठी बाह्य परीक्षक म्हणून जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख आदरणीय प्रा. डॉ. जयवंतराव जुकरे सर तसेच गोपिकाबाई सिताराम गावंडे कॉलेज, उमरखेड येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख आदरणीय प्रा. डॉ. विनायक इंगळे सर यांची उपस्थिती होती.

पीएचडी पदवी प्राप्त केल्यानंतर संशोधक विद्यार्थी प्रा. डॉ. नामदेव दिगंबर सूर्यवंशी यांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रियदर्शनी शिक्षण संस्था, आमनी बु. ता. महागाव जि. यवतमाळ च्या सचिव आदरणीय श्रीमती. वनमालाताई राठोड, कोषाध्यक्ष आदरणीय श्री. सुनीलभाऊ राठोड सर तसेच संस्थेतील प्राचार्य श्री जयकुमार वानखेडे सर आणि मुख्याध्यापक श्री कोंडीबा कावडे सर तसेच प्रा. श्री पी. टी. विणकरे , प्रा. दिनेश सुर्यवंशी सर, श्री शंभू सोनटक्के सर,श्री अमोल पवार सर आणि सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व सर्व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे हदगाव तालुका तसेच नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत असून, त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक केले जात आहे.



## काल रात्री हरडफ येथे वादळी वाऱ्यामुळे झाड घरावर पडले

# माहूर तालुक्यातील पानोळा तांडा व वाई बाजार येथे पिकांचे खुप मोठे नुकसान

दैनिक वादळ वार्ता

**श्रीक्षेत्र माहूर | प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील पानोळा तांडा आणि वाई बाजार व किनवट तालुक्यातील मौजे.पिपंळगाव फाटा येते पण खूप मोठे तुफान पाणी असुनी पाणपटी वर झाड पडला असून शिवारात वादळी वारे अवकाळी पावसाने प्रचंड नुकसान केले तर मौजे हरडफ येथे मोठे झाड संयुक्त कुटुंब राहत असलेल्या घरावर पडल्याने संपूर्ण घरच मोडल्याची घटना घडली असून सुदैवाने जीवित्तहानी झाली नाही तर वादळी वाळे आणि पावसाने शेत शिवारातील आंवा गहू आणि जवारी इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याची घटना दि २७ रोजी सायंकाळी ७ वाजता घडली आहे.२७ मार्च रोजी सायंकाळी प्रचंड वादळी वारे आणि अवकाळी पावसाने माहूर/ किनवट तालुक्यात प्रचंड धुमाकूळ घातला यामुळे व्यापारपेठेवर परिणाम झाला तर अनेक घरावरील टीन पत्रे उडाली माहूर तालुक्यातील मौजे हरडफ वैधील संयुक्त कुटुंबात राहत असलेल्या प्रभाकर किसन निळेवाड दीपक निळेवाड प्रमोद निळेवाड यांच्या घरावर घराशेजारी असलेले मोठे झाड पडल्याने तिघांचे घर माडले तर दीपक आणि प्रमोद यांना किरकोळ मार लागला सुदैवाने जीवित्त हानी झाली नाही परंतु संपूर्ण घराची मोड तोड झाल्याने त्यांचे प्रचंड नुकसान होऊन संसार उघड्यावर पडला आहे तालुक्यातील गौजे दत्त मांजरी येथील शेतकऱ्यांच्या शेतात उभा असलेला गहू तूर मक्का जवारी बासह इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले तर शेकडा शेतकऱ्यांच्या हात खचाला कामी येणारा आंब्याच्या झाडावरील आंब्यांचे वादळी वारे अवकाळी पावसाने प्रचंड नुकसान झाले त्यामुळेनुकसान झालेला शेतकरी हवालदील झाला असून माहूर तालुक्यात निसर्गचक्र वारंवार कापत असल्याने शासनाकडून तात्काळ सर्वेक्षणाचे आदेश देऊन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी तात्काळ पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करत नुकसान भरपाई मिळवून यावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी नागरिकातून होत आहे.



# काळमाथा येथील दलित वस्तीच्या रोडवरील अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त

दैनिक वादळ वार्ता

**औसा | प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील काळमाथा येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर मधील सार्वजनिक रस्त्यावर दादागिरी करून अतिक्रमण केल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत याबाबतची सविस्तर माहिती अशी की काळमाथा येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगरच्या दलित वस्तीच्या रोडवर मागील पंधरा वर्षांपासून बाबुशा तालमशेठ यांनी कुक्कुटपालन बांधून कोंबडी विक्रीचा व्यवसाय सुरू केल्यामुळे या परिसरात कोंबडीच्या मासाची दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे तसेच अंगणवाडी क्रमांक एक व दोन आणि सार्वजनिक समाज मंदिराच्या रस्त्यावर भानुदास मुढाळे यांनी नातलगाच्या मदतीने स्लॅब चे घर बांधून रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे या परिसरातील नागरिकांना देण्या जाण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे सदरील दोन्ही व्यक्तींनी दादागिरी करून दलित वस्तीच्या रोडवर अतिक्रमण केल्याने होत असलेल्या त्रासाबाबत ग्रामपंचायत आणि मासिक सभेमध्ये वेळोवेळी निदर्शनास आणून देऊन सुद्धा अतिक्रमण काढले जात नाही थोड्याच दिवसात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम या परिसरात विविध क्रमाने साजरा करण्यासाठी व्यक्ती निर्माण होत आहे तरी सदर अतिक्रमण धारकास प्रशासनाच्या वतीने योग्य त्या सूचना देऊन तात्काळ अतिक्रमण काढून घ्यावे आणि येथे रस्त्यासाठी असलेला मंजूर निधी उपयोगात आणून दलित वस्ती मधील रस्ता तयार करावा अशी मागणी संपतराव उत्तरेश्वर गायकवाड यांनी गटविकास अधिकारी औसा तहसीलदार औसा आणि पोलीस उपनिरीक्षक पोलीस ठाणे भादा यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# बेकायदा जनावर घेऊन जात असताना तिघांवर गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

**मांडवी | प्रतिनिधी**

मांडवी पोलीस गस्तीवर असताना पळशीगावा जवळ जनावरांची मोठी पीकप बेकायदा घेऊन जाणाऱ्या तिघांना पोलिसांनी पकडले आहे दोन लाखांचे वाहन व चार जनावरे पार्डी येथील गोशाळेत हस्तांतरित करण्यात आली आहेत.दि.२६ मार्च रोजी दुपारी २ च्या सुमारास मांडवी पोलीस ठाण्याचे सपो निरीक्षक श्री गंगाधर गायकवाड, पोकाँ श्री मनिष ठाकरे, वाहन चालक श्री विजय आडे हे गस्तीवर होते. मांडवी ते पिंपळगाव मार्गावरील पळशीजवळील पुलावर एक वाहन संशयास्पद स्थितीत आढळले. पोलिसांनी हे वाहन रोखले आणि सर्वे कागदपत्राची मागणी केली असता त्यात चार बैल निर्दयीपणे कोडंलेले आढळले.होते



पोलिसांनी पिकअप एपी २२ एए ६७९८ हे वाहन व चार बैल जप्त केले. हे बैल आदिलाबाद जिल्ह्यातील इचोडा बाजार येथे विकण्या साठी नेत असल्याचे व काहीही कागदपत्रे नसल्याचे चालकाने सांगितले. त्यामुळे २ लाख ८२ हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेत बैल पार्डीतील गोशाळेकडे सुपुर्द करण्यात आली तर आरोपी शेख नजीर रजा, शेख अलाउद्दीन शेख शैबोद्दीन रा. केशव नितीन नीलेश मोतेवार रा. पिंपळशेंडा ता. किनवट या तिघांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास जमादार कनाके करीत आहे.

# पशुसंवर्धन विभागाचा कारभार चव्हाट्यावर

दैनिक वादळ वार्ता

**भोकरदन | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कडून ०२ वर्षापासून जाहिरातीसाठी अथक प्रयत्न , मंत्री आणि विभाग सुस्त

खरी चूक पशुसंवर्धन विभागाचीच

न्याय मिळण्यासाठी सर्व पुरावे घेऊन थेट मुख्यमंत्र्यांकडे जाणार..

विभागानेच शक्य ते प्रयत्न करून जाहिरात प्रसिद्ध करावी अशी विद्यार्थ्यांची मागणी व विनंती

जाहिरात प्रसिद्ध होत नसेल तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मोठ्या स्वरूपाचे आंदोलनाचा पशुधन पर्यवेक्षक संघटनेकडून इशारा





सध्या मुख्यमंत्र्यांकडून नोकरभरतीसाठी होत असलेल्या विविध स्तरावर खूप मोठ्या प्रमाणावर प्रत्येक विभागाकडून खूप मोठ्या प्रमाणावर काम चालू असल्याचे दिसून येते दरम्यान पशुसंवर्धन विभागाकडून पशुधन पर्यवेक्षक च्या २६६ जागेच्या पदभरती मध्ये केलेला कारनामा स्पष्टपने उघड झाल्याचे दिसून येत आहे

*आम्हाला जाहिरातीची गरज आहे आम्हाला कुणालाच त्रास देण्याचा हेतू मनात जरी नसला तरी आमच्या भविष्यासाठी आमच्यावर होत असलेल्या अन्यायाला आम्ही उत्तर देणार अशी विद्यार्थ्यांची भूमिका*.

नोकरी साठी वाढत चाललेली स्पर्धा, ग्रामीण भागात पशुपालकांची होत असलेली वणवण ह्या गोष्टींचा विचार केला तर विद्यार्थ्यांची मागणी चुकीची म्हणता येणार नाही

सामान्य प्रशासन विभाग यांचेकडून २६६ पदांसाठी पशुसंवर्धन विभागाने त्यांना शक्य असलेल्या पूर्ण ताकदीने परवानगी मिळवावी आणि जाहिरात १ महिन्यात प्रसिद्ध न केल्यास संपूर्ण महाराष्ट्रातून खूप मोठे आंदोलन केले जाईल याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळाली

## जावळी गावचे भुमिपुत्र योगेश पांचाळ यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड

## पारंपारीक लाकडी व्यवसाय करुन पांचाळ दांपत्यांनी केले योगेशला पोलीस उपनिरीक्षक

# उपनिरीक्षक पदी निवड झाल्याने जावळी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने योगेश पांचाळ यांचा यथोचीत सत्कार संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**औसा | प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील जावळी येथील सर्वसामान्य कुटुंबातील आई महादेवी व वडील गोविंद पांचाळ यांच्या पोटी जन्म घेतलेले योगेश पांचाळ , पोलीस उपनिरीक्षक योगेश चे आई व वडील यांनी जावळी येथुन गेल्या तीस वर्षापुर्वी उदरनिर्वाह भागवण्यासाठी सोलापुर शहर गाठले ,सोलापुरात गोविंद पांचाळ व त्यांच्या पत्नी महादेवी यांनी आपला पारंपारीक सुतार काम व्यवसाय करत पिठ गीरणीच्या माध्यमातुन आपल्या मुलांना उच्चशिक्षण दीले ,घरची अर्थीक परिस्थीती नसताना आपण भोगलेला संघर्ष व नशिबी आलेले अष्टदारिद्र्य आपल्या मुलांच्या नशिबी येउ नये अस प्रत्येक आई वडीलांना वाटत तसा विचार योगेशच्या आई वडीलांना भेडसावत होता ,





यावेळी योगेशचा मोठा भाउ अमर पांचाळ व वहिनी प्रतिमा पांचाळ यांनी योगेशला शिक्षणात मोलाची साथ दिली व भावाने अर्थीक मदत केली व मेहनत करत आपल्या भावाचे स्वप्न पुर्ण केले ,पण योगेश ने जिद्ध ,चिकाटी,व मेहनतीच्या बळावर कुटलही यश संपादन करता येत याच ज्वलंत उदाहरण मनजेच जावळीचे योगेश पांचाळ ,मनात आपल्या संघर्षमय आई बापाचे स्वप्न व अंगावर खाकी वर्दी साठी सदैव अभ्यासाच्या जोरावर जिद्धीने धडपडणार मन योगेश पांचाळने स्वप्नाचा पाठलाग केला व आज तेच स्वप्न सत्यात उतरल व एका सुतारकाम करणार्या आई बापाच लेकराने पोलीस दलात उपनिरीक्षक पदावर गवसनी घातली , खुप खडतर अशा संघर्षमय प्रवासात पावलोपावली अर्थीक अडचण आली पण योगेश ने मात्र आपण थांबायच नाही ठरवल वअखेर उपनिरीक्षक पदी यश संपादण केले ,आज जावळी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतिने आपल्या मायभुमीत यशाच उंच शिखर गाठणार्या योगेश पांचाळ व आई वडीलांचा यथोचीत सत्कार संपन्न झाला यावेळी ओ.बि.सी सेल जिल्हाध्यक्ष सुधिर पोतदार ,जिल्हा परीषद सदस्य तानाजी जाधव ,विश्वकर्मा संघटना जिल्हाध्यक्ष सुदर्शन बोराडे ,पंचायत समिती सदस्य राम बिराजदार ,किल्लारी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक डॉ विशाल शहाने ,

सरपंच सुरेखा मोहनराव यादव ,जिवनज्योत हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ विनोद बिराजदार ,डॉ संगिता बिराजदार ,मा.उपसभापती दिनकर मुगळे ,तानाजी सुरवसे ,काशिनाथ हेंबाडे ,दत्तात्र्य यादव ,विजयकुमार यादव ,दिलीप यादव ,औदुंबर यादव ,जिवन मुगळे ,रामेश्वर मुळे ,सिराज पटेल ,गोरोबा आळणे ,विठ्ठल थोरात ,शिवाजी पांचाळ ,विठ्ठल पांचाळ ,व्यंकट पांचाळ ,विश्वकर्मा संघटनेचे सचिव परमेश्वर पांचाळ , शंकर पाचाळ विजयकुमार पांचाळ ,मा.सरपंच भानुदास पांचाळ ,गोविंद पांचाळ सह जावळी ग्रामस्थ व पांचाळ परीवारातील सदस्य उपस्थीत होते ,

# धक्कादायक घटना ! विद्युत टॉवरची तार चोरताना टॉवर कोसळला,पुण्याच्या दोन तरुणांचा जागीच मृत्यू

## अपघाताचा बनाव फसला ; मृतदेह परभणीत नेताच प्रकार उघड

दैनिक वादळ वाता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील नांदूरघाट शिवारात विद्युत टॉवरची तार चोरी करण्याच्या प्रयत्नात असताना एक भीषण दुर्घटना घडली.टॉवर अंगावर कोसळल्याने पुण्यातील दोन संशयित तरुणांचा जागीच मृत्यू झाला.दि.२९ मार्च रविवार च्या मध्यरात्री ही घटना घडली असून, मृतांची नावे अविनाश पटोळे आणि आकाश आडे अशी आहेत. दरम्यान,हा प्रकार लपवण्यासाठी साथीदारांनी केलेला रस्ते अपघाताचा बनाव पोलिसांनी उघडकीस आणला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहिती नुसार,पुण्याच्या हडपसर भागातील काही तरुण नांदूरघाट शिवारात विद्युत टॉवरच्या तारा चोरण्यासाठी आले होते. मध्यरात्रीच्या सुमारास अविनाश आणि आकाश हे दोघे टॉवरवर चढून तारा काढण्याचा प्रयत्न करत होते.मात्र,टॉवरचे संतुलन बिघडल्याने अवजड लोखंडी टॉवर थेट खाली कोसळला.या ढिगाऱ्याखाली दबले गेल्याने दोघांचाही जागीच अंत झाला.

**असा फसला साथीदारांचा बनाव**

घटनेनंतर घाबरलेल्या इतर साथीदारांनी कायदेशीर कचाट्यातून सुटण्यासाठी एक डाव रचला.त्यांनी दोन्ही मृतदेह एका इर्टिगा कारमध्ये टाकले आणि हा रस्ते अपघात असल्याचे भासवून थेट परभणी गाठली.मात्र, परभणीत पोहोचल्या नंतर कारमधील साथीदार पसार झाले. कार चालक सूरज गिराम याने मृतदेह रुग्णवाहिकेतून दवाखान्यात हलवण्याचा प्रयत्न केला.मात्र, तरुणांच्या शरीरावरील जखमा आणि कार चालकाची संशयास्पद हालचाल पाहून मृतांच्या नातेवाईकांनी संशय व्यक्त केला.अखेर पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला.

**तपासाची चक्रे वेगवान फॉरेन्सिक तपास**

बीड येथील फॉरेन्सिक पथकाने नांदूरघाट शिवारातील घटना स्थळाला भेट देऊन पुराव्यांचे नमुने गोळा केले आहेत.केज पोलिसांनी कार चालक सूरज गिराम याला ताब्यात घेतले असून, पसार झालेल्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.बेकायदेशीररीत्या विद्युत साहित्याची चोरी करणे आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.हा केवळ अपघात नसून चोरीच्या उद्देशाने केलेली कृती होती हे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.या प्रकरणा तील इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.असे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे.



## अरुणराव अंजान यांना पितृशोक,लक्ष्मणराव अंजान यांचे वृद्धाप काळाने दुख:द निधन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ केज चे सदस्य तथा शीतल ट्रेडर्सचे संचालक अरुण जी अंजान व इंजिनिअर ज्ञानोबा अंजान यांचे वडील श्री.लक्ष्मणराव संभाजी अंजान यांचे सोमवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ९६ वर्षे इतके होते. अत्यंत शांत व प्रेमळ स्वभावाचे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती.त्यांच्यावर अंत्यसंस्कार त्यांच्या मूळगावी सनगाव ता. अंबेजोगाई (लोखंडी सावरगाव पासून पश्चिमेस ३ किलोमीटर अंतरावर ) येथे मंगळवार दि.३१ मार्च रोजी सकाळी ९ वाजता पार पडणार आहेत.त्यांच्या पाठीमागे पत्नी,दोन मुले, एक मुलगी,सुना,नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार



आहे.त्यांना रोटरी क्लब ऑफ केज, केज तालुका व्यापारी महासंघ व केज वासियांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात शोककळा पसरली आहे.

## रिपब्लिकन सेना बीड लोकसभा क्षेत्र प्रमुखपदी पुरुषोत्तम (गोटू) वीर यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर पक्षबांधणीला गती देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय व्यापक संवाद बैठकीत बीड लोकसभा क्षेत्र प्रमुखपदी पुरुषोत्तम (गोटू) वीर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ही बैठक दिनांक २९ रोजी शासकीय विश्रामगृह, बीड येथे रिपब्लिकन सेनेचे युवा नेतृत्व विजय दादा साळवे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील पक्ष संघटनाला नवसंजीवनी मिळणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशिल सूर्यवंशी तसेच विजय दादा साळवे यांच्या हस्ते



पुरुषोत्तम (गोटू) वीर यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी वीर यांनी पक्षाच्या विचारसरणीला जनतेपर्यंत पोहोचवून संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात नवनिर्वाचित महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशिल सूर्यवंशी यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. तसेच बीड जिल्ह्यातील माजलगाव, परळी, अंबाजोगाई, केज, किल्ले धारूर, शिरूर, आष्टी, गेवराई आणि पाटोदा या विविध तालुक्यांतील शेकडो कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्षप्रवेश करून पक्षाची ताकद वाढवली. त्यामध्ये निकेश बनसोडे व राहूल शिरोळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह पक्ष प्रवेश केला.

बैठकीदरम्यान जिल्ह्यातील प्रत्येक तालुका तसेच गावागावात पक्षाच्या शाखा स्थापन करून संघटन अधिक मजबूत करण्याचा ठोस संकल्प करण्यात आला असून यामुळे आगामी काळात रिपब्लिकन सेनेचे जाळे तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाणार असल्याचे वीजय दादा साळवे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे निवेदक इनकर सर यांनी व्यवस्थित मांडले तर आभार प्रदर्शन प्रा.गव्हाणे यांनी केले. या बैठकीस राहूल गवळी, शुद्धोधन मोरे, पंडित ओव्हाळ, वशिष्ठ लांडगे, विश्वनाथ तोडके, वैजनाथ गडशिंग, भुषण लोळगे, राहुल सिरसट, सय्यद अन्वर, अनिल डोंगरे, भुषण काकडे, लक्ष्मण गव्हाणे, रंजीत वाघमारे, शेख युनुस, निलेश ससाणे, रोहित वीर, बाळू वीर, संतोष सोनकांबळे, विशाल ससाणे, यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध घटकांतील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्ते अपघात ग्रस्तांसाठी जीवनदायी असलेली पी एम राहत योजना प्रभावी पणे राबवा-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने दीड लाख रुपया पर्यंतचे उपचार पूर्णतः उपलब्ध करून देणाऱ्या पी एम राहत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी मधील राज्य आरोग्य हमी सोसायटीची भूमिका महत्त्वाची आहे.रुग्णांना गोल्डन अपार मध्ये तातडीचे उपचार देऊन मृत्यू दर कमी करण्यास कटिबद्ध राहावे असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी आपल्या राज्यातील जनतेला केले आहे. मंत्रालयात आयोजित जन आरोग्य योजनेच्या बैठकीत करण्यात आले आहे केंद्र शासनाच्या सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचारमिळावेत यासाठी प्रधानमंत्री रस्ता अपघातग्रस्त रुग्णालयीन उपचार आणि हमी उपचार(पी एम-राहत) योजना आणली आहे या योजनेअंतर्गत आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत नोंदणी करत असलेल्या राज्यातील कोणत्याही रुग्णालयात दाखल झालेल्या अपघात ग्रस्तांना तातडीने सात दिवसापर्यंत दीड लाख रुपयापर्यंत उपचार पूर्णता निशुल्क रोख रहित देण्यात येत आहेत अनेकदा अपघात झाल्या वर आर्थिक अडचणीमुळे उपचारास विलंब होतो वेळीच उपचार मिळत नाहीत.पी एम -राहत योजनेची प्रभावी अंमल बजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.पी एम- राहत योजनेच्या प्रभावी अंमल बजावणीत राज्य आरोग्य सोसायटी प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असून रुग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी रुग्णालयात दाखल करणे पोलिसांकडून अपघाताची खात्री करून उपचारांना मान्यता देणे या योजनेअंतर्गत उपचारास मंजूरी देणे व मंजूर दावे जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करण्याची आरोग्य सोसायटीची जबाबदारी आहे.महाराष्ट्रात (पी एम -राहत) योजना



राबवण्या साठी परिवहन विभागाच्या अखत्यारीत राज्य रस्ते सुरक्षा परिषद ही नोडल एजन्सी नियुक्त करण्यात आली असून योजनेची एक परिपूर्ण परिवहन विभागामार्फत दिली जातात रस्ते अपघातानंतर २४ तासाच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व अपघात ग्रस्तांना भारतीय तसेच परदेशी नागरिकांनाही पीएम- राहत योजनेचा लाभ मिळणार आहे. उपचार खर्चअपघाताच्या तारखेपासून कमाल सात दिवसापर्यंत समाविष्ट (आवृत) केला जाणार आहे या योजनेअंतर्गत नियुक्त (निर्दिष्ट) व अनियुक्त (अनिर्दीष्ट) रुग्णालयामध्येही उपचार करता येणार आहेत व पी एम जे ए वाय,एम जे पी जे ए वाय व पी एम राहत योजनेत समाविष्ट अंगीकृत रुग्णालय (निर्दिष्ट)रुग्णालय आहेत या व्यतिरिक्त सर्व रुग्णालय अनियुक्त (अनिर्दीष्ट) रुग्णालय आहेत.या सर्व रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्णास स्थिरीकरण उपचार अपेक्षित आहे. स्थिरीकरण उपचारानंतर रुग्णास पुढील उपचारा साठी नियुक्त (निर्दिष्ट) अंगीकृत रुग्णालयात हलविणे आवश्यक आहे आपत्कालीन परिस्थितीत नागरिक ११२ या आपत्कालीन प्रतिसाद साह्य प्रणाली क्रमांकावर संपर्क साधावा तसेच या बैठकीला सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव व प्रमुख अधिकारी उपस्थित होते तरी सदरील योजना संपूर्ण महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातही प्रभावीपणे राबवावी असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## सादोळा गावाचा अभिमान–डॉ.भारत अंकुश सोळंके यांना डॉक्टरेट प्रदान



दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

सादोळा गावाचे भूषण असलेले डॉ. भारत अंकुश सोळंके यांना Savitribai Phule Pune University यांच्याकडून डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या प्रबंधाला विद्यापीठाने मान्यता दिल्यामुळे हा मानाचा सन्मान त्यांना मिळाला असून सादोळा गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. सोळंके यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे सादोळा गावाचे नाव उज्ज्वल झाले असून तरुण पिढीसमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा राहिला आहे. शिक्षण क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा त्यांच्या या कार्यातून मिळत आहे.

या गौरवाच्या प्रसंगी पुणे येथे विविध मान्यवर उपस्थित होते. यामध्ये ॲड. सुदर्शन साळुंके, श्रीमती करुणा सुदर्शन साळुंके, धर्मराज सोळंके, प्रशांत सोळंके, श्रीराम सोळंके, प्रवीण सोळंके, हर्षवर्धन (दामू) येरंडे, अनिल सोळंके व विशाल सोळंके यांचा समावेश होता. सर्वांनी डॉ. सोळंके यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.डॉ. भारत अंकुश सोळंके यांचे हे यश सादोळा गावासाठी अभिमानाची बाब ठरली असून भविष्यातही ते समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत राहतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राम जन्मोत्सव शोभायात्रा उत्साहात; वंचित बहुजन आघाडीचा सामाजिक ऐक्याचा संदेश

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी । प्रतिनिधी**

काल रात्री राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने आष्टी येथे भव्य शोभायात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात निघालेल्या या शोभायात्रेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या शोभायात्रेत वंचित बहुजन आघाडीचे जालना जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात, तालुका अध्यक्ष हनुमंत मोरे, शहर अध्यक्ष गणेश वैद्य यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. वंचित बहुजन आघाडीच्या आष्टी शाखेच्या वतीने प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तसेच बसस्थानक परिसरात वंचित बहुजन आघाडीतर्फे नागरिकांना फळे वाटप करण्यात आले व पिण्यासाठी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शोभायात्रा संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांचा पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दरम्यान, रमजान ईदच्या निमित्तानेही वंचित बहुजन आघाडी आष्टी शाखेने ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देत पाणी वाटपासाठी पेंडाल उभारला होता. धार्मिक सणांमध्ये समन्वय साधत सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तारीख शेख, सुभाष इंगळे, इनायत पठाण ,राजू शेख, शाकीर मणियार, युसुफ अंसारी, सचिन थोरात, भारत मोरे, बी.टी. थोरात, विकास धोत्रे, भाऊसाहेब पोटे, मोईन भाई शेख, निहाल भाई कुरेशी, फरीद भाई राज (ग्रामपंचायत सदस्य), अजहर शेख, अलीम शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी वंचितचे ज्येष्ठ नेते चौखाजी नाना सौंदर्य, जमील भाई शेख, शिवाजी अण्णा डोळस, बालासाहेब फुलारी, नामदेव नाचन, संदीप मोरे, अलीम सय्यद तसेच सहकारी शिवलिंग आप्पा शेटे, शिवा आप्पा खिस्ते, राजाभाऊ आघाव, रमेश केंद्रे, रफिक भाई अंसारी आदी उपस्थित होते.

## इंदिरा नगरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अभिषेक टाकणखार

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील इंदिरा नगर येथे दिनांक २८ रोजी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर समाज बांधवांची बैठक उत्साहात पार पडली. ही बैठक भिमराव टाकणखार व प्रकाश उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.बैठकीत खेळीमेळीच्या वातावरणात जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी अभिषेक टाकणखार, उपाध्यक्षपदी आदित्य झोडगे, सचिवपदी रमेश बल्लाळ तर कोषाध्यक्षपदी रोहित टाकणखार यांची निवड करण्यात आली.यावेळी मार्गदर्शक मंडळात डी. के. टाकणखार, सुधाकर जावळे, महादू टाकणखार, सुशिल शिंदे, जितेंद्र तोडके, राजेश झोडगे, राजेंद्र जावळे, प्रवीण सोनपसारे, विलास भाग्यवंत, अविनाश टाकणखार, अश्विन टाकणखार,



आकाश घुगे, अजय जावळे, बाबासाहेब दाभाडे, शशिकांत घनघाव, बाळू जावळे आदींची निवड करण्यात आली.तसेच या बैठकीस चेतन फंदे, युवराज जावळे, दशरथ साळवे, मधुकर तोडके, विनोद टाकणखार, चंद्रकांत लोंढे, धम्मा साळवे, संगपाल साळवे, त्रिशरण टाकणखार, अजय शिरसट, रत्नदीप टाकणखार, भारत टाकणखार, करण मिसाळ, महिवाल घाडगे, देवील साळवे, सागर उजगरे, सिद्धांत उजगरे, स्वप्निल टाकणखार, पप्पू डोंगरे, अजय जाधव, प्रशांत टाकणखार, प्रज्वल गायकवाड, संकेत गायकवाड, राजतनय शिंदे, आनंद जावळे, सलमान पटेल, शंभू साळवे, कचरू खरात, राणू साळवे आदींची उपस्थिती होती.जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार समितीच्या वतीने यावेळी व्यक्त करण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077